महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास लेखाशिर्ष ३०५५ ००५२-३५ "बसस्थानकाचे आधुनिकीकरण व इतर सोयी सुविधा कार्यक्रमाअंतर्गत" रु.१९९.९२ कोटी इतका निधी वितरीत करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
परिवहन विभाग
शासन निर्णय :-क्र.एसटीसी-०६२६/प्र.क्र.८८/परि-१
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २५ ऑगस्ट, २०२६.

संदर्भ :- उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांचे पत्र क्र.राप/लेखा/अवंवि/१४९०, दिनांक.१७.०७.२०२६.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास नविन साध्या वाहनांची खरेदी देयके अदा करण्यासाठी निधीची आवश्यकता असल्याने, सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पामध्ये "३०५५ ००५२-३५ "रा.प महामंडळाच्या बसस्थानकाचे आधुनिकीकरण व इतर सोयी सुविधा कार्यक्रमाअंतर्गत" या लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या तरतूदीतून निधी वितरीत करण्याबाबत उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांनी संदर्भीय पत्रान्वये शासनास विनंती केली आहे. त्याअनुषंगाने, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास नविन साध्या वाहनांची खरेदी देयके अदा करण्यासाठी एकूण रु.१९९.९२ कोटी इतका निधी **(अक्षरी रूपये एकशे नव्याण्णव कोटी ब्याण्णव लाख रुपये फक्त)** रोखीने प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर रु.१९९.९२ कोटी हा खर्च सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा आणि सदर खर्च "मागणी क्रमांक बी-३, ३०५५ मार्ग परिवहन ००-१९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपकामांना सहाय्य (००) (००) (०१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ बसस्थानकांचे आधुनिकीकरणांतर्गत बांधकाम व इतर सोयी सुविधा (३०५५ ००५२) ३५ भांडवली मत्तेच्या निर्मीतीकरीता अनुदान" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. सदरचे अर्थसहाय्य हे "सशर्त" आहे.

३. यासाठी परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत असून त्यांच्या कार्यालयातील आंहरण व संवितरण अधिकारी असलेले लेखाधिकारी यांनी सदर रक्कम उपमहाव्यवस्थापक (वित्त), महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, मुंबई यांचे नावे नव्याने उघडण्यात आलेल्या "आभासी वैयक्तिक ठेव लेखा खाते" (Virtual Personal Deposit Account) मध्ये सुपुर्द करावी.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३७६/२०२६/व्यय-८, दि.१८.०८.२०२६ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०८२५१७२६११७७३९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by SUDHIR JAIVANT KOLEKAR
Date: 2026.08.25 17:27:12 +05'30'

(सुधीर कोळेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन , मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. सभापती, महाराष्ट्र विधान परिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
५) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधान सभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
६) मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधान परिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
७) मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधान सभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
८) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
९) अपर मुख्य सचिव (परिवहन), मंत्रालय, मुंबई.
१०) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
११) खाजगी सचिव, मा.मंत्री (परिवहन) महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
१२) खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री (परिवहन) महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
१३) उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई.
१४) वित्तिय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई.
१५) महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता /लेखा परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
१६) महालेखापाल (वाणिज्यिक लेखा परिक्षा), मुंबई
१७) कक्ष अधिकारी (व्यय-८, अर्थ-११), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८) गृह विभाग, बीयुडी-१, मंत्रालय, मुंबई
१९) निवडनस्ती कार्यासन परि-१, गृह विभाग, मंत्रालय,मुंबई.